ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १० डिसेंबर, १९५२ | अंक ४७

## विविध माहिती

**ऑटो रिक्षांवर कर**—बिहार सरकारनें ऑटो रिक्षांवर कर बसविण्याचें ठरविलें असून, त्यासाठी मोटार व्हिइकल्स ॲक्टमध्यें दुरुस्ती करणारें बिल त्या राज्याच्या विधिमंडळांत मंजूर करून घेण्यांत येणार आहे, असें समजतें.

**म्हैसूर किर्लोस्कर कंपनीचा नफा**—म्हैसूर किर्लोस्कर ह्या कारखान्याला जून, १९५२ अखेर संपणाऱ्या वर्षांत १·०७ लाख रुपये निवळ नफा झाला. कंपनीनें ५ टक्के करमाफ नफा जाहीर केला आहे. रिझर्व्ह फंडांत ६,००० रुपयांची भर घालण्यांत आली असून तो आतां ३ लाख रुपये झाला आहे.

**मद्रासला कॅन्सरचें इस्पितळ होणार**—मद्रास जिल्ह्यांतील कोडुरू ह्या खेड्यांत कॅन्सरचें इस्पितळ बांधण्यासाठी वुइमेन्स इंडिअन असोसिएशन ह्या संस्थेला राज्यसरकारनें एक एकर जागा दिली आहे. संस्थेला आणखीहि कांहीं जागा देण्याचा सरकार विचार करीत आहे.

**भात कांडण्याचें नवीन यंत्र**—लखीमपूर येथील एका भातगिरणीच्या मालकानें आपल्या फिटरच्या मदतीनें भात सडण्याचें एक नवें यंत्र तयार केलें आहे. यंत्रांत मोटारीच्या क्रॅंकशॅफ्टचा आणि एका पुलीचा उपयोग करण्यांत आला आहे.

**अंधत्वावर नवा इलाज**—बिकानेर मधील डॉ. भिवानी ह्यांनीं अंधांच्या डोळ्यांत प्लॅस्टिकचें बुबुळ बसविण्याचे प्रयोग चालविले आहेत. नुकत्याच मेलेल्या माणसाचें बुबुळ काढून त्याचें कलम करण्याचे युरोपांतील प्रयोग यशस्वी होत नसल्यानें, त्यांनीं हें नवीन संशोधन चालविलें आहे.

**आयुर्वेदीय दवाखाने**—गेल्या महिन्यापासून पंजाब सरकारनें ग्रामीण भागांत २० आयुर्वेदीय आणि युनानी पद्धतीचे दवाखाने सुरू केले आहेत. ह्या दवाखान्यांसाठी दरमहा २५,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. प्रत्येक दवाखान्यांत एक वैद्य अगर एक हकीम काम करील आणि एक मदतनीसहि असेल.

**चीनची पहिली स्वदेशी 'ट्रॉलर'**—चीनच्या तंत्रज्ञांनीं सर्वस्वी चीनमधील साधनसामुग्री वापरून 'ट्रॉलर' ह्या जातीची पहिली स्वदेशी बोट बनविली आहे. बोटीचें वजन ५८ टन आहे आणि तींत ३५ टन वजनाचा माल मावतो. बोट बांधण्यास ७७ दिवस लागले.

**अलास्कांतील महागाई**—अलास्का हा अमेरिकन प्रदेश उत्तर ध्रुवाजवळ आहे. तेथें दोन खोल्यांच्या ब्लॉकला दरमहा १,३०० रुपये भाडें पडतें, हजामतीला १२ रुपये पडतात पण एका अंड्याला फक्त ८ आणे द्यावे लागतात.

**मुंबईतील घरांची टंचाई**—मुंबई नगरपालिकेचे कमिशनर श्री. नायक ह्यांनीं एका प्रसंगीं अशी माहिती सांगितली कीं बृहन्मुंबईत सध्या १ लक्ष, ३० हजार कुटुंबांना रहाण्यास जागा पाहिजे आहे. शहरांतील गलिच्छ वस्तीचा भाग नाहींसा करून गरिबांना चांगलीं घरें पुरविण्यासाठी ४० कोटी रुपये खर्च येईल, असेंहि ते म्हणाले.

**लग्नाचें वय कमी करा**—ब्रिटनच्या रॉयल कमिशन ऑन् मॅरेज अँड डायव्होर्सकडे डॉ. मेरी स्टोपस ह्यांनीं एक निवेदन पाठविलें आहे. मुलींच्या लग्नाचें कायदेशीर वय १५ ठेवावें अशी सूचना त्यांनीं केली आहे. जीवशास्त्रदृष्ट्या जननक्षम झाल्यावर स्त्रीला लग्न करण्याची मोकळीक असावी, असें त्यांचें मत आहे.

**धातूंच्या मोडीची निर्यात**—सप्टेंबर, १९५२ अखेर संपलेल्या सहा महिन्यांत १,४६,५०६ टन वजनाची धातूची मोड परदेशीं पाठविण्यांत आली, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ज्या मोडीचा देशांत उपयोग करतां येण्यासारखा नव्हता अशीच मोड निर्यात करण्यांत आली. निर्यातीच्या आठपट मोड भारतांत पुन्हा वापरण्यांत येतें असेंहि सांगण्यांत आलें.

**टिटॅनिअमच्या वाळूची निर्यात**—रत्नागिरीजवळ मालगुंड येथें टिटॅनिअम सांपडणारी वाळू आहे. ती वाळू निर्यात करण्याचें काम मुंबईच्या रुइआ अर्मान सिंडिकेट ह्या कंपनीनें नुकतेच सुरू केलें आहे. वाळूंत टिटॅनिअमचा अंश बऱ्याच प्रमाणांत सांपडतो.

**संयुक्त राष्ट्रसंघाच्या वर्गण्या**—संयुक्त राष्ट्रसंघाला १९५२ सालीं रशियाकडून ४२,९९,००० डॉलर्स वर्गणीदाखल मिळावयाचे होते. परंतु रशिआनें आतांपर्यंत फक्त २,२६,१५० डॉलर्सच दिले आहेत. भारतानें आपली सर्व वर्गणी दिली आहे. वर्गणी बाकी असलेल्या इतर देशांत ब्रिटन, पाकिस्तान व न्यूझीलंड हे देश आहेत.


**राणीच्या विम्याची काळजी कोणाला?**—ब्रिटनची राणी एलिझाबेथ हिचा राज्याभिषेक समारंभ पुढील वर्षी होणार आहे. राज्याभिषेक समारंभ प्रसंगीं निशाणें पुरविणारे, हॉटेलवाले व स्मरणीय चिजा तयार करणारे, अशा शेंकडों व्यवसायिकांनीं राणीच्या जीविताचे विमे उतरविले आहेत. राणीच्या जीवितास अपाय झाल्यास राज्याभिषेक होणार नाहीं. त्यामुळें आर्थिक नुकसान होऊं नये म्हणून ही दक्षता घेण्यांत येत आहे. विमा कंपन्या १०० पौंडांच्या विम्याला १० शिलिंग हप्ता घेत आहेत.

## नेतृत्व—आपली प्राचीन परंपरा

प्राचीन हिंदी कारागिरांनी शतकानुशतके अविश्रांत प्रयत्न करून उंची दर्जाचे पोलाद बनविण्याचे रहस्य आत्मसात करून घेतले होते. त्यांतच कुशल कलाव तांनीं ज्यांच्यामुळें त्यांची ख्याति पसरली होती अश विविध नमुन्यांची जोड दिली. हे भारतीय कारागी आपले कौशल्य व बुद्धिमत्ता यांच्या जोरावर अत्य मजबूत व सुंदर अशा वस्तू बनविण्यांत यशस्वी झा होते व त्या वस्तू भारतीय जहाजांतून जगांतील प्रत्ये प्रसिद्ध बाजार पेठांत नेल्याजात होत्या.

भारतीय पोलाद निर्मितीचा धंदा इतका विशाल विस्तृत होता कीं इसवीसन ४१५ मध्यें भारतांत ए घडीव लोह स्तंभ बनविण्यांत आला होता. तो पु एकोणीसाव्या शतका पर्यंत जगांतील इतर कोणत्याही देशांत तयार होऊं शकला नसता. २३ फूट ऊंच व ६ टन वजनाचा असा हा अजस्त्र स्तंभ सम्राट कुमारगुप्त यानें उभारलेला होता व तो इतक्या तांत्रिक कुशलतेनें तयार करण्यांत आला होता कीं महान शास्त्रज्ञ व इंजिनियर तो पाहून अजूनही थक्क होतात.





उत्तरोत्तर विकास पावलेली बुद्धिमत्ता व दृढनिश्चय यांच्या योगें उत्साहित झालेली
भारतीय कारागिरी आतां पुन्हा नव्यानें चमकूं लागली आहे.
भारतीय पुनरुत्थापनाच्या या कार्यांत टाटा स्टील अत्यंत महात्वाची कामगिरी बजावीत आहे.

**दी टाटा आयर्न अॅण्ड स्टील कंपनी लिमिटेड**

TH.3014

# अर्थ

बुधवार, ता. १० डिसेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## महाराष्ट्रीय बँकांचें एकत्रीकरण

### चर्चेचा समारोप

बँकांच्या एकत्रीकरणाची चर्चा "अर्था" मध्यें गेले सहा आठवडे चालू होती, त्यांत तज्ञ बँकर्सनीं भाग घेऊन आपआपलीं अनुभवसिद्ध मतें प्रतिपादन केलीं. बंगालमधील चार मोठ्या बँकांचें एकत्रीकरण १९५० मध्यें होऊन त्यांतून "युनायटेड बँक ऑफ इंडिया" ही सुमारें ४० कोटी रु. जिंदगीची भारतांतील सातव्या अनुक्रमाची बँक निर्माण झाली; राजस्थानांतीलहि तीन–चार बँका एकत्र येण्याच्या प्रयत्नांत आहेत; ह्या दोन घटनांपासून महाराष्ट्रानें जर कांहीं शिकलें तर बरें, अशा विचारानें श्री. चिं. वि. जोग ह्यांनीं "महाराष्ट्रीय बँकांना विनंती" केली. बंगालमधील आणि राजस्थानांतील परिस्थिति भिन्न असून राजस्थानांतील बँकांना एकत्र येण्यास वेगळी विचारप्रणाली कारणीभूत आहे, असें सांगून श्री. जोग ह्यांनीं संयुक्त बँकेपासून होणारे फायदे विशद केले. महाराष्ट्रांतील महाराष्ट्रीय नियामक मंडळांखालील आठ शेड्यूल्ड बँका एकत्रित झाल्या तर त्यांचा ताळेबंद कसा होईल, त्याचे आकडे त्यांनीं दिले, आणि योग्य तऱ्हेच्या फेरफारांनीं जिंदगींतून नफ्याचें प्रमाण वाढवितां येईल आणि संयुक्त रीत्या खर्चाचें प्रमाण कमी करतां येईल, असें दाखवून देऊन अनावश्यक शाखा बंद करून, दुर्लक्षित महाराष्ट्रांत नव्या शाखा काढून महाराष्ट्राच्या सर्वांगीण औद्योगिक उन्नतीस अधिक कार्यक्षमरीत्या हातभार लावतां येईल असें प्रतिपादन केलें. नॉन–शेड्यूल्ड बँकांनींहि हा प्रश्न विचारांत घ्यावा आणि सर्व बँकांच्या हितसंबंधी लोकांनीं ह्या बाबतींत जरूर लक्ष घालावें व अशा प्रयत्नांस सुरवात करावी, असें त्यांनीं सुचविलें.

श्री. जोग ह्यांच्या लेखानें महाराष्ट्रांतील बँकिंग क्षेत्रांत बरीच खळबळ उडवून दिली आणि त्यांच्या लेखावर सर्वत्र चर्चा होऊं लागली. "अर्था" नें ह्या विषयावर अनेक शेड्यूल्ड-नॉन शेड्यूल्ड बँकांच्या अध्यक्षांचे व संचालकांचे लेख प्रसिद्ध करून, ह्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार होण्यास मदत केली आणि चर्चेचा दर्जा अत्युच्च पातळीवर राखण्यांत यश मिळविलें. त्यामुळें, ह्या प्रश्नावरील चर्चेत बँकांच्या किंवा व्यक्तींच्या नांवांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख कोठेंहि न येतां, एकत्रीकरणाचे फायदे–तोटे त्यांतील अडचणी, त्याच्या मर्यादा, इत्यादि स्पष्ट होण्यास सहाय्य झालें. कोणताहि धंदा मोठ्या प्रमाणावर केला तर तो अधिक किफायतशीर होतो, हें साधें तत्त्व बँकिंगलाहि लागू असल्यानें, बँकेचा आकार मोठा असण्यापासून होणाऱ्या फायद्याविरुद्ध कोणीहि तक्रार केली नाहीं. प्रश्न फक्त आजच्या अनेक लहान व मध्यम आकाराच्या ठिकठिकाणच्या बँका एकत्रित केल्यानें होणारा ताळेबंदी फायदा प्रत्यक्ष व्यावहारिक तोट्यापेक्षा ज्यास्त भरून, आर्थिक हिताचा ताळेबंद नफा दाखवील किंवा नाहीं, हा होता. अस्तित्वांत असलेल्या बँकांचे सध्यांचे व्यवहार मोठ्या एकत्रित बँकेकडे गेल्यानें लोकांच्या आर्थिक व्यवहाराची जी कांहीं गैरसोय होईल, ती दूर कशी करावयाची ह्याचा श्री. जोग ह्यांनीं खुलासा केलेला नव्हता. वेगवेगळ्या स्थानिक गरजा भागविणाऱ्या निरनिराळ्या दृष्टिकोनाच्या बँका आज जी कामगिरी बजावीत आहेत, तिला मोठ्या बँकेच्या कारभारानें बाध येईल, हा महत्त्वाचा मुद्दा दुसऱ्या बाजूनें जोरानें मांडण्यांत आला. मोठी बँक हवी असली, तर त्यासाठीं चांगल्या चाललेल्या लहान बँकांचा बळी देण्याचें प्रयोजन नाहीं; त्या बँकांसहि आपल्या आर्थिक संसारांत उपयुक्त स्थान आहे, असेंहि प्रतिपादन करण्यांत आलें.

पुणें येथें भरलेल्या बँकिंग प्रदर्शनाचे प्रसंगीं डॉ. जी. एस. पाणंदीकर, प्रा. धनंजयराव गाडगीळ व श्री. वामनराव वर्दे ह्यांनीं ह्या विषयावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मत व्यक्त करणें स्वाभाविकच होतें. श्री. पाणंदीकर म्हणाले, "बँकांच्या एकत्रीकरणाचा प्रश्न हा अत्यंत बिकट आहे. बंगालमधील 'बँकिंग क्रायसिस'च्या झळींतून बेंगॉल सेंट्रल बँक, कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन, कॉमिल्ला युनियन बँक व हुगळी बँक ह्यांतून युनायटेड बँक ऑफ इंडियाची निर्मिति झाली. राजस्थानांत, सरकारी व ट्रेझरीचें काम एकाच मोठ्या बँकेकडे सोंपविण्याच्या सरकारी योजनेमुळें तेथील तीन–चार बँका एकत्र येण्याचा प्रयत्न करूं लागल्या. परंतु, ती गोष्ट आतां अवघडच दिसते. पुष्कळ शाखा असणाऱ्या मोठ्या बँका आणि आपआपल्या विशिष्ट टापूंत थोड्याशा शाखा असणाऱ्या लहान बँका, ह्यांच्या तुलनात्मक फायद्या–तोट्याबद्दल सध्यां महाराष्ट्रांत चर्चा चालू आहे. बाहेरील दडपणाखेरीज बँकांचें एकत्रीकरण शक्य होत नसतें आणि ज्यांना महाराष्ट्रीय बँकांचें एकत्रीकरण घडवून आणावयाचें असेल, त्यांनीं अशी एखादी तरफ (लिव्हर) शोधून उपयोगांत आणल्याविना येथेंहि एकत्रीकरण होणें कठीण आहे. बँकांचे चालक ही एकत्रीकरणाच्या मार्गांतील मोठी अडगळ असते, असें मला वाटतें. भारतासारख्या देशांत, मोठ्या बँकांबरोबर लहान बँकांनाहि स्थान आहे आणि एकत्रीकरणाची आवश्यकता व तें घडवून आणण्याची क्रिया, ह्या बाबतींत बँकांनाच पाऊल टाकूं द्यावें, हें इष्ट. रिझर्व्ह बँक कोणत्याहि बँकेवर एकत्रीकरण लादीत नाहीं, हें योग्यच आहे. परंतु एकत्र येऊं इच्छिणाऱ्या बँकांना ती केव्हांहि तत्परतेनें सहाय्य करील." श्री. धनंजयराव गाडगीळ हे आपल्या भाषणांत म्हणाले, "भारतांतील परिस्थितींत कोणत्या प्रकारच्या बँकिंग रचनेची आवश्यकता आहे, ह्याचा अद्याप नीटसा विचार झालेला नाहीं. कांहीं मोजक्या बँकांच्या शेकडों शाखांकरवीं येथील बँकिंगची गरज भागणार नाहीं. तेव्हां रिझर्व्ह बँकेच्या बँकिंगविषयक संशोधन खात्यानें ह्याबाबत आकडे जमवून, गरजा अजमावून मार्गदर्शन करावें व हिंदी बँकिंगनें कोणत्या मार्गानें प्रगति करावी हें स्पष्ट करावें, हें उत्तम." श्री. वर्दे ह्यांनीं ह्याहिपुढें जाऊन, लहान-लहान स्थानिक बँकांच्या आवश्यकतेवर भर दिला. आपल्या इकडील लहान बँका अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि नेटानें व काटकसरीनें कारभार करीत आहेत, त्याची कल्पनाहि शहरी बँकर्सना येणार नाहीं, असा

त्यांनीं अनुभव सांगितला, आणि मोठ्या बँकांचे हातून स्थानिक बँका आज जी कामगिरी करीत आहेत ती समाधानकारक पार पाडली जाणार नाहीं, असें ते म्हणाले.

मोठ्या बँका, लहान बँका, त्यांचें एकत्रीकरण, त्यांचें परस्पर सहकार्य, इत्यादि बाबींवरील व्यक्त झालेलें अधिकारी लोकांचें मत विचारांत घेतलें असतां एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे, लहान बँका एकजात कमी करून त्यांची जागा मोठ्या बँकांनीं घ्यावी, असें कोणीच म्हणत नाहीं. लहान बँकांच्या वैशिष्ट्यपूर्ण स्थानाचें महत्त्व श्री. जोग ह्यांनीं विशद केलें नव्हतें. त्यामुळें त्यांच्या भूमिकेबद्दल कांहीं गैरसमज झाला असल्यास तो डॉ. पाणंदीकर, गाडगीळ व वैद्य ह्यांच्या भाषणांनीं दूर झाला आहे. श्री. पाणंदीकर ह्यांनीं एकत्रीकरणाच्या मार्गांतील अडचणींचा उल्लेख केला हें योग्यच झालें. एकत्रीकरण आवश्यक असतांहि व्यवस्थापकांच्या स्वार्थी हट्टामुळें तें होऊं शकलें नाहीं आणि त्यामुळें ठेवीदारांचें नुकसान होऊन बँकिंगवरील जनतेचा विश्वास उडूं लागला, असें व्हावें असा कोणीच दुराग्रह धरणार नाहीं; धरूं नये. परंतु, बँकांच्या चालकांचा स्वार्थ इतर संस्थांच्या चालकांपेक्षा ज्यास्त असतो, असें कोणी सूचित केलें तर तें मात्र अगदीं चुकीचें होईल. चालकांनीं स्वतः स्थापलेल्या, संवर्धिलेल्या बँक संस्थांबद्दल त्यांना आपुलकी वाटली आणि त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाबद्दल त्यांनीं थोडा आग्रह धरला, तर तो असमर्थनीय नाहीं. तेव्हां, ह्या सर्व प्रश्नांचा विचार सर्व बाजूंनीं, तारतम्यानेंच केला पाहिजे. असलेली घडी मोडण्यापूर्वी, नव्या घडीच्या यशाची आगाऊ खात्री झाली पाहिजे, आणि हें काम एकट्या-दुकट्या किंवा कांहीं बँकांच्या हातून पार पडणें अवघड आहे.

भारतांतील, त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील, बँकिंगच्या रचनेंत लहान–मोठ्या, जॉइंटस्टॉक–सहकारी, शहरी–ग्रामीण बँकांचें स्थान कोणतें हें अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं. तोंवर लहान बँकांची जागा मोठ्या बँकांनीं घ्यावी, असें केवळ म्हणण्यापासून फारसा फायदा होणार नाहीं. तोट्यांत चाललेल्या, उजळ भवितव्य नसणाऱ्या लहान बँकांनीं विलिनीकरणाचा प्रयत्न करण्यास कांहींच हरकत नाहीं; त्यांत बँकिंगच्या भविष्यकालीन व्यापक योजनेचा प्रश्नच येत नाहीं. परंतु, आपल्या येथें किती बँका असाव्या व त्यांच्या शाखांचें जाळें कसें असावें ह्यांचा पुरा अभ्यास होऊन त्यांतून निघणाऱ्या निष्कर्षाप्रमाणें अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जोंवर रिझर्व्ह बँक घेत नाहीं, तोंवर एकत्रीकरणाचें पद्धतशीर पाऊल पुढें पडणें शक्य नाहीं. प्रा. गाडगीळ ह्यांनीं रिझर्व्ह बँकेच्या ह्या संबंधांतील जबाबदारीचें दिग्दर्शन केलें, त्यानें प्रस्तुत प्रश्नाचा समारोप झालेला आहे असें मानण्यास हरकत नाहीं. श्री. जोग ह्यांनींहि आपल्या लेखाचे शेवटीं, "हें एकत्रीकरण कसें करावयाचें, हा प्रश्न रिझर्व्ह बँकेकडे सोंपवून तिची मदत आपणांस घेतां येईल" असें म्हटलें होतें. ह्या प्रश्नांतील गुंतागुंत लक्षांत घेतां, परस्पर–सहकार्याचे मार्ग शोधणें आज अधिक श्रेयस्कर ठरेल, आणि त्या दिशेनें प्रयत्न होण्यास प्रस्तुत विषयावरील चर्चा उपयोगी होईल असा विश्वास आहे.

---

**पुस्तकांची देणगी**—नवी दिल्ली येथील इंडिअन कौन्सिल फॉर वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेला अमेरिकन सरकारच्या माहितीखात्यानें नुकतींच प्रकाशित झालेलीं ६०० पुस्तकें देणगीदाखल दिलीं आहेत. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र ह्या विषयांवरील हीं पुस्तकें आहेत.

## बँक डिस्प्यूट्स् मिटविण्याचे अधिकार रिझर्व्ह बँकेकडेच असावे

गेल्या आठवड्यांत नवी दिल्ली येथें मजूर मंत्री श्री. गिरी यांचे अध्यक्षतेखालीं, इंडस्ट्रियल रिलेशन्सबाबतच्या कमेटीची सभा तीन दिवस चालली होती. या सभेचा मुख्य हेतू या प्रश्नाबाबत स्थूल मानानें धोरण निश्चित करून, पार्लमेंटच्या पुढील बैठकींत येणाऱ्या नवीन इंडस्ट्रियल रिलेशन्स बिलाची रूपरेषा आंखणें असा होता. कमिटीपुढील विषय पत्रिकेंत अनेक बाबींबरोबर बँक डिस्प्यूट्सचाहि विषय स्वतंत्र असा होता. बँकांतील नोकर-वर्गाच्या पगाराचा प्रश्न हा इतर उद्योगधंद्यांतील प्रश्नांप्रमाणें इंडस्ट्रियल ट्रायब्यूनलकडे सोंपविणें इष्ट नसल्याचें देशांतील, लहान मोठ्या अशा अनेक बँकांतर्फे ध्वनित करण्यांत आलेंच असून, हा प्रश्न या धंद्यावर नियंत्रणाचे अधिकार असणाऱ्या रिझर्व्ह बँकेकडेच सोंपविण्यांत यावा अशीहि मागणी करण्यांत आली आहे. वरील कमेटीनें याबाबत कोणता निर्णय घेतला आहे हें इतक्यांत समजणें शक्य नसलें तरी वरील मागणीप्रमाणें नवीन बिलांत तरतूद झाल्यास बँकिंगसारख्या स्वस्थता व सुरक्षितता यांची आवश्यकता असणाऱ्या जोखमीच्या धंद्यास हितप्रदच ठरणार आहे. बँकांतील नोकरांच्या मागण्यांस मजुरांच्या चळवळीचें स्वरूप येणें इष्ट होणार नाहीं. तसेंच या संस्थांमधून काम करणाऱ्या वरिष्ठ व कनिष्ठ वर्गामध्यें तेढीचें व प्रक्षुब्ध वातावरण निर्माण होण्याची पाळीच येऊं नये असें आम्हांस वाटतें. रिझर्व्ह बँक ही या धंद्यांतील वरिष्ठ सत्ताधारी संस्था असल्यानें, व प्रत्येक बँकेच्या तपासणीचें कार्य ती करीत असल्यानें, पगाराचें स्केल कोणत्या वर्गात कितपत असणें वाजवी होईल, तसेंच नोकरवर्गाला कोणकोणत्या सवलती व हक्क असणें जरूर आहे, याबाबत तिलाच योग्य निर्णय देतां येईल. बँकिंगच्या परिस्थितीची नीट कल्पना रिझर्व्ह बँकेइतकी दुसऱ्यांना असणें शक्य होत नाहीं. या पगाराचे स्केल वर्गवारीनें तसेंच स्थानदृष्ट्याहि निश्चित होणें जरूर आहे. रिझर्व्ह बँकेकडून अशा बाबतींत व्यावहारिक दृष्ट्याहि योग्य तो विचार होण्यास वाव राहील. तरी अशा स्वरूपाची उपयुक्त योजना या नवीन बिलांत होईल अशी उमेद वाटते.

---


## Notice To Contractors

Sealed Tenders are invited for providing the electrical installation of Light and Power for the Head Office Building of the Bank of Maharashtra, Ltd., opposite Vishrambag Wada, Poona 2.

The Tenders will be issued from 16th December 1952 during office hours on payment of Rs. 10/– per set.

The last date for receiving Tenders will be 29th December 1952. Tenders may be submitted upto 4 P. M. on that day.

The Bank does not bind itself to accept the lowest or any Tenders. It reserves the right to reject any or all Tenders without assigning any reason for doing so.

C. V. JOAG,
Manager.

2nd December, 1952.

# उद्याच्या बँकिंगची दिशा

## इष्ट मार्गाचें दर्शन

(लेखकः--श्री. श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ ")

*[ जॉइंट स्टॉक बँकांत जुन्या – नव्या, शेड्यूल्ड-नॉन-शेड्यूल्ड, लहान-मोठ्या, असे प्रकार आहेत आणि सहकारी बँकांच्या व्यवहारांतहि अशीच विविधता आहे. कांहीं बँकांना अतिशय नामवंत संचालक लाभले आहेत, तर कांहींचा व्यवहार सामान्य परंतु निष्ठावंत संचालकांचे देखरेखीखालीं आदर्श पद्धतीनें चालू आहे. बँकिंग क्षेत्रांतील सर्व संस्थांसंबंधीं एकत्रित विचार करणें आणि त्याबाबत निष्कर्ष काढणें अत्यंत अवघड आहे. एकास लागू असलेली गोष्ट दुसऱ्यास गैरलागू ठरण्याचा संभव आहे, हें लक्षांत घेऊनच खालील लेखाचें वाचन करावें, अशी विनंती आहे. अनेक गोष्टींची काढलेली सरासरी त्यांपैकीं कोणत्याहि एका गोष्टीची पूर्णपणें निदर्शक होत नाहीं, तसेंच येथें घडणार आहे, ही गोष्ट ध्यानांत बाळगणें अगत्याचें आहे. व्यवहाराच्या पद्धतशीरपणासाठीं सहकारी बँकांना जॉइंट स्टॉक बँकांचा आदर्श दाखविला जातो, म्हणून येथील विवेचनांत सहकारी बँकांचा वेगळा उल्लेख केला नाहीं. ]*

### मागसलेलें बँकिंग

आपल्या देशांत बँकांची संख्या व त्यांचे व्यवहार ह्यांत पुष्कळ वाढ झाली असली, तरी देशाचा विस्तार, त्याची लोकसंख्या, त्याची नैसर्गिक संपत्ति, इत्यादींचा विचार केला असतां आपल्याकडे अद्याप बँकिंग कितीतरी मागसलेलें आहे, हें स्पष्ट होईल. आपली शिल्लक बँकांत ठेवण्याची प्रवृत्ति शहरांतून वाढली असली, तरी खेडेगांवी जनतेंत तिचा प्रसार व्हावयास पाहिजे. बँकिंगच्या बाबतींत कांहीं प्रांत पुष्कळच पुढें गेलेले आहेत, तर कांहीं प्रांत फारच मागसलेले आहेत. शहरांतून व मोठ्या गांवांतून बँककचेऱ्यांची दाटी झाली आहे, परंतु लहान गांवांतून शाखा काढण्यास बँका आतुर नाहींत. तर एक अशा शाखांचा खर्च तरी निदान भागला पाहिजे, आणि दुसरें म्हणजे लहान ठिकाणीं

---

" बँका — काल, आज व उद्या " ह्या पुस्तकाचें प्रकाशन रविवार, दि. ३०-११-१९५२ रोजीं शेठ प्राणलाल देवकरण नानजी यांच्या हस्तें झालें. ह्या पुस्तकाच्या संपादनाचें काम श्री. श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ " ह्यांनीं केलेलें असून दि डेक्कन बँक्स असोसिएशन व पुणें बँकिंग असोसिएशनतर्फे तें प्रकाशित करण्यांत आलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतील हा लेख " अर्था " ची पुरवणी म्हणून देण्यांत येत आहे.

सुरक्षितता वाटण्याजोगी आजची परिस्थिति नाहीं. इतर देशांतील बँकांच्या नव्या नव्या कल्पना येथें रुजण्यास बराच काळ लागेल. उदाहरणार्थ, 'फिरत्या' बँकेची कल्पना कितीतरी रम्य आहे. परंतु तिची शक्यता आणि व्यवहार्यता ह्यांच्या मर्यादा लक्षांत घेऊन, तो उपक्रम येथें करणें धाडसाचेंच ठरण्याचा संभव आहे.

### रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाचा परिणाम

गेल्या कांहीं वर्षांत, रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणामुळें आणि कायद्यांतील तरतुदींमुळें बँकिंगच्या व्यवसायास कांहीं निश्चित वळण लागलेलें आहे. बँकेचें कर्जविषयक धोरण काय असावें, ठेवींच्या किती प्रमाणांत कर्ज द्यावें, तारण कसें व किती घ्यावें, व्यवस्थापकास आणि नोकरवर्गास पगार किती असावा, इत्यादि बाबी संचालकांच्या मर्जीच्या राहिलेल्या नाहींत. रिझर्व्ह बँक दैनंदिन व्यवहारांत ढवळाढवळ करीत नसली, तरी तिचेकडे तपशीलवार तक्ते पाठवावे लागतात आणि रिझर्व्ह बँकेच्या तपासणीसाठी बँकांना नेहमीच सुसज्ज असावें लागतें. त्यामुळें बँकांच्या व्यवहारावर अप्रत्यक्ष नियंत्रणहि आलें आहे. ह्याचा परिणाम संचालकांच्या अधिकारावर थोडाफार झाला असल्यानें कांहींना त्याचा जाच वाटत असला, तरी सर्वसाधारणपणें बँकांचें पाऊल योग्य दिशेनें पडण्यास त्याचा उपयोग झाला आहे. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष व्यवहाराशीं संबंध येत नसल्याकारणानें त्यांना व्यावहारिक अडचणी नीट समजूं शकत नाहींत, अशी टीका ऐकूं येते. ती कांहीं अंशीं खरी असली, तरी व्यवहारांत गुरफटलेल्यांना दुसऱ्या, स्वतंत्र आणि तात्त्विक दृष्टिकोनाचीहि आवश्यकता असते.

### रिझर्व्ह बँकेनें कृतिमान व्हावें

बँकिंग कंपन्यांच्या कायद्यानें रिझर्व्ह बँकेस देखरेखीचे व तपासणीचे अधिकार दिले आहेत. त्यांत ( १ ) तपासणी, ( २ ) विशिष्ट गोष्ट करण्याची सूचना करणें, ( ३ ) बँकिंग व्यवसाय चालविण्यासाठी लायसेन्स देणें आणि ( ४ ) शाखा उघडण्यास परवानगी देणें, हे अधिकार महत्त्वाचे आहेत. बँकांच्या तपासणींत रिझर्व्ह बँकेला कित्येक दोष आढळले, त्यांत ठेवींच्या मानानें कर्जें फाजील असणें, हा एक होय. परंतु, त्यांचें प्रमाण काय असावें, हें कधींहि स्पष्ट करण्यांत आलेलें नाहीं. हीं प्रमाणें स्पष्ट करतां येणें अशक्य आहे काय? डायरेक्टरांनीं स्वतःला बरींच कर्जें घेण्यास अद्याप प्रभावी प्रतिबंध झालेला

नाहीं. लहान बँकांच्या कर्जांत वैयक्तिक तारणावरील कर्जांचा भरणा मोठा आहे, असें नुसतें म्हणण्यांत काय अर्थ आहे? तारण घेऊन कर्जे देण्यापेक्षा वैयक्तिक पतीवर देणें, हेंच खरें बँकिंग आहे; मोठ्या शहरांत ज्या प्रकारचें तारण मिळूं शकतें तसें लहान गांवांत मिळूंच शकत नाहीं. कर्जांच्या अटी पाळल्या गेल्या, म्हणजे वैयक्तिक पतीवरील कर्जे देण्यास कांहींच हरकत असूं नये. लहान बँकांतून दीर्घ मुदतीच्या सरकारी रोख्यांतून गुंतवणूक ज्यास्त प्रमाणांत आढळते. दीर्घ मुदतीचीं कर्जे उभारण्यास सरकारला परवानगी रिझर्व्ह बँकेनें कां द्यावी? अशी एकीकडे परवानगी देऊन दुसरीकडे त्यांत बँकांनीं पैसे गुंतवूं नये असें सांगणें विसंगत आहे. बँकांच्या तपासणीचे रिपोर्ट एकत्र आणून त्यांची छाननी केली जाते किंवा नाहीं, हें कळण्यास मार्ग नाहीं. निदान विशिष्ट क्षेत्रांतील बँकांवरील रिपोर्टांचा विचार तरी एकदम करण्यांत यावा, म्हणजे तेथील वाईट कुळांबद्दल बँकांना इशारा देतां येईल. रिझर्व्ह बँकेनें पत्करलेल्या जबाबदाऱ्यांचे मानानें तिच्या जवळ लायक अधिकारी व नोकरवर्ग आहे काय, ह्याविषयीं शंका वाटते. बँकांच्या तपासणी-साठीं पाठविलेल्या अधिकाऱ्यांना बँकिंगच्या व्यवहारांची सर्वांगीण माहिती असते काय? बँकिंगसंबंधीं रिझर्व्ह बँकेची एकादी निश्चित योजना आहे, असें वाटत नाहीं. कोणत्या मार्गानें जावयाचें, हें ठरलेलें दिसत नाहीं. देशांतील प्रत्येक बँकेवर रिझर्व्ह बँकेचें लक्ष आहे, असें म्हणणें चुकीचें होईल. बँकिंग कायद्यानें पुष्कळ सुधारणा घडविल्या असल्या, तरी त्या कायद्याचा पुरा फायदा पदरांत पडावयाचा असेल तर रिझर्व्ह बँकेकडून निश्चयात्मक अशा कृतीची अपेक्षा आहे. शाखा उघडण्यास परवानगी देण्याच्या बाबतींतहि रिझर्व्ह बँकेचें कोण-तेंच स्थायी धोरण नाहीं. मोठ्या बँकांना कोठेंहि शाखा उघडण्यास मोकळीक असते, परंतु लहान बँकांची मात्र कुचंबणा होते. मोठ्या बँकांना शाखा उघडून फक्त ठेवी गोळा करावयाच्या असतात; कर्जे देण्याचा व्यवहार करण्यास त्या तत्पर नसतात, असा अनुभव आहे. जेथें ठेवी घ्यावयाच्या, तेथेंच त्यांचा कांहीं भाग गुंतविण्याची सक्ति करतां येण्याची कांहीं योजना आखतां येणें शक्य आहे. कायद्याच्या वेगवेगळ्या कलमांचा व त्यांतील शब्दांचा अर्थ लावण्याची वेळ येते, तेव्हां रिझर्व्ह बँक आपलें स्वतःचें मत देण्यास नाखुष असते. बँकांना त्यांच्या कायदेशीर सल्लागारांचा सल्ला विचारण्यास सांगण्यांत येतें. ज्यांनीं कायद्याची अंमलबजावणी करावयाची, त्यांनीं ही वृत्ति धारण करणें श्रेयस्कर नाहीं.

### बँकिंगच्या वाढीस सहकारी चळवळीचा उपयोग

मराठी मुलुखापुरतें पाहिलें, तर सहकारी चळवळीच्या प्रसाराचा बँकिंगच्या वाढीस येथें चांगला उपयोग झाला आहे, हें सहज दिसून येतें. येथील जॉइंट स्टॉक बँकांच्या संस्थापकांपैकीं कित्येकांना बँकिंगचा परिचय व अनुभव सहकारी बँकांमुळेंच मिळालेला आहे. बँकांच्या नोकरवर्गापैकींहि कितीतरी नोकर सहकारी बँकांतूनच जॉइंट स्टॉक बँकांकडे गेलेले आहेत. शहरांप्रमाणें ग्रामीण विभागांतहि चेक वगैरेचा प्रसार सहकारी बँकिंगमुळेंच झाला; त्याचा फायदा जॉइंट स्टॉक बँकांना मिळाला व मिळत आहे. बँकिंगच्या प्रगतीचें सहकारी चळवळीस वाजवी श्रेय दिलें जाणें अगत्याचें आहे, म्हणून त्याचा येथें मुद्दाम उल्लेख केला आहे.

### पैसेवाल्या नव्या वर्गास बँकिंगची संवय लागली पाहिजे

हिंदी बँकिंगची भरभराट होण्यासाठीं बँकांचे हातीं जनतेनें बचत केलेला पैसा एकत्रित व्हावयास पाहिजे. त्यासाठीं, जनतेला आपले पैसे बँकांत ठेवण्याची व बँकांमार्फत आर्थिक व्यवहार करण्याची सवय लागली पाहिजे. मध्यम वर्गास हें सर्व कळत असलें, तरी त्याच्याजवळ पैसाच नसल्याकारणानें बँकांच्या सोईचा त्याला स्वतःला फायदा होऊं शकत नाहीं आणि मध्यम वर्गीयांकडून बँकांकडे पैसाहि फारसा जमूं शकत नाहीं. पैसे मिळविणारा व शिल्लक टाकणारा आतां जो नवा वर्ग निर्माण झालेला आहे, त्याला बँकिंगची संवय लागली तरच बँकांकडील ठेवी वाढूं शकतील. हें घडवून आणण्याचें कार्य बिकट असलें, तरी तें हातीं घेण्यांत आलें पाहिजे. ग्रामीण भागांतील पैशाचा विनियोग संघटित रीत्या बँकांमार्फत व सहकारी संस्थांमार्फत झाला पाहिजे. खेडेगांवांतील गरजा व अडचणी ह्यांच्या कात्रींतूनच मार्ग काढावा लागेल हें उघड आहे.

### बँकेच्या सोई गिऱ्हाइकांचे प्रवृत्तीवर अवलंबून

बँकांनीं आपल्या गिऱ्हाइकांकरितां किती सोई केल्या पाहिजेत, किंवा त्यांना करतां येणें शक्य आहे, ह्याचा विचार केला तर त्याबाबत अद्याप प्रगतीस बराच वाव आहे असें आढळून येईल. पाश्चात्य देशांतील बँकांनीं ह्याबाबत केलेले उपक्रम आमच्या इकडे मार्गदर्शक होण्याजोगे आहेत. बँकांच्या सेवेचे किती विविध प्रकार असूं शकतात, त्याचें वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. परंतु, आपल्या इकडील सामान्य लोकांची प्रवृत्ति लक्षांत

घेऊनच सोई वाढविणें शक्य होईल हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. सेफ कस्टडीचा व सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा प्रसार आतां वाढला आहे, त्यास तशीं कारणेंच झालीं, म्हणून ती प्रवृत्ति वाढली. परंतु सोईसाठी लहानसाहि मोबदला देण्यास गिऱ्हाईक तयार नसेल, तर बँका सोई तरी कशा वाढविणार? विशिष्ट सोईसाठी किंवा सेवेसाठी स्वतंत्र कमिशनची आकारणी जर केली नाहीं, तर ठेवीदारांचीं बँकांतील खातीं तरी एवढीं मोठीं असावयास पाहिजेत, कीं त्यामुळें बँकेला नव्या सोई व सेवा परवडाव्या; पण तसेंहि होत नाहीं. पे-इन-स्लिपला चेक जोडावयास टाचणी लागते, तीहि स्वतःची न वापरतां बँकेकडून ती फुकटांत मिळवावयाची अशी जेथें नीति आहे, तेथें गिऱ्हाइकांना सवलती व सोई देऊन कितपत परवडेल, अशी बँकांना साधार भीति वाटल्यास नवल नाहीं.

### बँकांना करतां येण्याजोग्या कांहीं सोई

तथापि, बँकांनीं कांहीं बाबतींत प्रयत्नांस प्रारंभ करण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, कोल्हापूरच्या व्यापाऱ्यास तेथील बँककचेरीच्या मार्फत मुंबई-दिल्ली प्रवासाचें तिकीट व रिझर्व्हेशन मुंबईस पोंचल्यावर तेथील बँककचेरींत मिळण्याची व्यवस्था बँकांना करतां येण्याजोगी आहे. क्रिकेटच्या सामन्याचें तिकीटहि अशाच रीतीनें काढून ठेवतां येईल, पुस्तकें-औषधें पाठवितां येतील, होटेलमध्यें खोली राखून ठेवतां येईल, बसची सीट रिझर्व्ह करतां येईल, वधू-वरांच्या आर्थिक परिस्थितीचा आगाऊ गुप्त रिपोर्टहि देतां येईल! इंग्लंड-मधील बँका भाजी घरीं पोंचवीत असल्या, तर आपल्या बँका कोळसा पोंचवूं शकतील. गिऱ्हाइकांच्या गरजा ज्या मानानें उच्च दर्जाच्या होतील व वाढतील त्यामानानेंच बँकांच्या सोईहि वाढतील. कारण, सोईमुळें होणाऱ्या फायद्यासाठी लहानसें तरी कमिशन देण्यास लोक तयार झाले पाहिजेत. एकाददुसऱ्यासाठीं बँका हीं कामें हातीं घेऊं शकणार नाहींत, हें उघड आहे.

### कर्जदारांकडून बँकेच्या अपेक्षा

आपल्या बँकांना ठेवीदारांकडून जेवढें सहकार्य व उत्तेजन मिळतें, तेवढें कर्जदारांकडून मिळत नाहीं, असा कित्येक वेळां अनुभव येतो. बँकेचें अंतिम स्थैर्य तिच्या कर्जदारांच्या पतीवर आणि सचोटीवर अवलंबून असतें. देणें रकमा जितक्या बिनचूक दाखवितां येतात, तितका बिनचूकपणा येणें रकमांचे बाबतींत दाखवितां येत नाहीं. तारणावर कर्ज दिलेलें असलें, तरी तारण भरपूर

ठरतेंच असें नाहीं. विनातारण कर्जास तर वैयक्तिक कर्जदाराची फक्त सचोटी-चाच पाया असतो. कर्ज कालांतरानें आणि दीर्घ परिश्रमानंतर फिटूं शकेल एवढ्यानें भागत नाहीं; तर तें ठरलेल्या वेळीं, विनबोभाट, बँकेच्या कचेरींत चुकतें झालें पाहिजे. असें झालें तरच बँकांना त्यांच्या भांडवलाचा अधिकांत अधिक फलदायी उपयोग करता येतो. परंतु तसें घडत नाहीं आणि दिलेलें कर्ज वक्तशीर फेड होत नाहीं. त्या कारणानें, बँकांची क्रेडिट निर्माण करण्याची शक्ति कमी होऊन त्यांच्या उपयुक्ततेस मर्यादा निर्माण होतात.

### हुंड्यांचा अभावः रिझर्व्ह बँकेची योजना

भारतांत बिल मार्केटचा अभाव आहे, ह्या गोष्टीचा विचार येथें करणें इष्ट होईल. व्यापारांत निघणाऱ्या येण्यांचे पोटीं हुंड्या काढून त्या डिस्कौंट करून घेतल्या, म्हणजे उधारींत पैसा गुंतून रहात नाहीं आणि येणें रकमेचें प्रत्यक्ष रोकड रकमेंत रूपांतर होऊन ती रक्कम किफायतशीर पुनः वापरतां येते. हुंड्या जरूरीप्रमाणें रीडिस्कौंट करतां येतात. अशा रीतीनें प्रत्यक्ष व्यवहारावर आधारलेल्या हुंड्यांतून क्रेडिटची व चलनाची निर्मिति होते. कोट्यवधि रुपयांच्या हुंड्या निघूं लागल्या, म्हणजे त्यांच्या खरेदी–विक्रीची बाजारपेठ निर्माण होते आणि पैसे गुंतविणाऱ्या संस्थांना अल्पकालीन गुंतवणुकीचें एक उत्कृष्ट साधन मिळतें. आपल्या देशांत अशा हुंड्यांचा व त्यांच्या बिल मार्केटचा अभाव आहे, ही हिंदी बँकिंगच्या वाढीच्या मार्गातील एक अडचण आहे. एकमेकाचें देणें वक्तशीर फेडण्याच्या संवयीवरच हुंड्यांची निर्मिति व बिल मार्केट अवलंबून रहाणार, हें उघड आहे. रिझर्व्ह बँकेची सध्या बिल डिस्कौंटची जी योजना अमलांत आहे, तिचा फायदा ज्या उत्पादकवर्गास वास्तविक मिळावयास पाहिजे, त्यास मिळत नाहीं; कारण १० कोटींच्या खालील बँकांना ह्या योजनेंत सामील होतांच येत नाहीं. कोपरगांव किंवा कोल्हापूर येथून वाहेर जाणाऱ्या मालाचे आधारावर काढलेल्या हुंड्या स्थानिक बँकांमार्फत डिस्कौंट होण्याची सोय झाली पाहिजे.

### कर्जाच्या अर्जाची छाननी

कर्जदारांना कर्ज देते वेळीं जी दक्षता घ्यावयास हवी, ती घेण्याची योजनाच कित्येक बँकांजवळ नसते आणि गडवडगुंडा करणारा कर्ज घेऊन जातो पण योग्य आणि कर्तबगार व्यापारी वा कारखानदार त्याला स्वतःच्या कामाचा बभ्रा करतां येत नाहीं म्हणून मागें रहातो, असें कित्येक वेळां घडतें.

कर्जाच्या अर्जाची छाननी काळजीपूर्वक केली जाणें फार अगत्याचें असतें. चार्टर्ड अकौंटंटसारख्या जबाबदार लोकांच्या मार्फत, बँकेच्या सूचनापत्रानुसार आलेले अर्जच विचारांत घ्यावयाचे, असें धोरण ठेवता येण्यासारखें आहे. ज्याच्या कर्तृत्वा-वर धंद्याची मदार असते, तो योजक तेथें कायम राहील, ह्याचीहि दक्षता घेतली पाहिजे. संबंधित लोकांची पात्रता, त्यांचें चारित्र्य, त्यांची वागणूक, त्यांचें व्यक्ति-मत्त्व, ह्या सर्वांचा विचार केला पाहिजे. सध्याच्या पद्धतींत तो केला जातोच असें म्हणतां येणार नाहीं. कर्ज मागितलें असेल, त्याच्यापेक्षा कमी रकम मंजूर केली म्हणजे त्यांत बँकेचें हित असतें, अशी कांहींची समजूत झालेली दिसते. वास्तविक, ज्या व्यवहारासाठी कर्ज घ्यावयाचें, तो व्यवहार पुरा होण्यास आवश्यक तें कर्ज कर्जदाराला मिळालें नाहीं, तर कमी रकमेचें कर्जहि धोक्यांत येण्याचा संभव असतो. कर्जाचा विनियोग ठरल्याप्रमाणें होतो किंवा नाहीं ह्या गोष्टीकडे बँकांनीं जितकें लक्ष पुरवावें तेवढें तें थोडेंच होईल. ज्याला कर्ज दिलें आहे त्याच्या मदतीसाठी तज्ज्ञ देणें हें कामहि बँकेच्या कक्षेंत येतें. कोणत्याहि उद्योगधंद्याचा अर्ज आला, तरी त्याची छाननी करण्यासाठी व कर्जदाराला मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञांची मदत बँकांनीं घेतली पाहिजे.

## इष्ट प्रथा पाडण्याची जबाबदारी

ह्यासंबंधांत संचालकांची भूमिका आणि कर्तव्य हीं स्पष्ट आहेत. चेअरमन-कडे किंवा इतर डायरेक्टरांकडे कर्जदारानें परस्पर जाऊन कर्जास मंजुरी कॅनव्हस करण्याची दुष्ट प्रथा जेवढ्या लवकर मोडेल, तेवढें इष्ट होईल. कर्जाचे अर्ज ठराविक चाकोरींतूनच गेले पाहिजेत, त्यांवर ठराविक संस्कार अवश्य झालेच पाहिजेत आणि अर्जाचा विचार करतांना त्याबाबत सर्व तपशीलवार माहिती उपलब्ध असली पाहिजे, ह्याकडे कटाक्षानें लक्ष पुरविलें पाहिजे. एकाद्याला कर्ज द्यावयाचें अगोदर ठरवावयाचें आणि तें नियमांच्या कक्षेंत आणून ठेवण्याचें काम तेवढें व्यवस्थापकाकडे सोंपवावयाचें, हें अनिष्ट होय. व्यवस्थापकानें होकार दिल्यानंतर संचालकांनीं नकार देण्याचा अधिकार जरूर तर चालवावा; परंतु व्यवस्थापकाचा नकार असतांनाहि किंवा त्याचा नकार येऊं नये म्हणून त्याच्या पाठीमागें कर्जें मंजूर करण्याचा आग्रह धरणें योग्य नाहीं. ह्यासंबंधांत चांगल्या प्रथा पाडण्याची जबाबदारी जाणत्या संचालकांवर येऊन पडते.

## लहान आणि मोठ्या बँका ह्याबाबत दृष्टिकोण

रिझर्व्ह बँकेनें देशांतील बँकिंग यंत्रणेंत सुधारणा करण्यासाठी शाश्वत स्वरूपाचा परिणाम घडविणाऱ्या मार्गांचाहि उपाय केला त्यांत बँकांचें एकीकरण हा एक महत्त्वाचा मार्ग होय, असें सांगण्यांत येतें. इतर क्षेत्रांप्रमाणेंच लहान बँकांपेक्षा मोठ्या बँका असणेंच अधिक हितावह आहे, ह्या युक्तिवादाबद्दल तीव्र मतभेद आहेत. मोठ्या बँकांचे फायदे वेगळे आहेत, तसेच लहान स्थानिक बँकांचेहि फायदे वेगळे आहेत. रिझर्व्ह बँकेचा ह्यासंबंधांत एखादा पद्धतशीर दृष्टिकोण आहे आणि त्या दिशेनें प्रयत्न वा उत्तेजन आहे असें वाटत नाहीं. केवळ एकत्रीकरण किंवा विलीनीकरण अथवा अंशतः विलीनीकरण ह्या घोषणांमुळें सामान्य जनतेची दिशाभूल होण्याचा संभव असतो. भारतांत बँकिंगच्या सोईची वाढ व्हावयास पाहिजे आणि त्या दृष्टीनेंच प्रत्येक प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. रिझर्व्ह बँकेचें स्वतःचें धोरण स्पष्ट नाहीं आणि कोणत्याहि धोरणास अनुसरून फारशी क्रियाहि नाहीं, असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. रिझर्व्ह बँकेकडून सध्यापेक्षा अधिक प्रभावी देखरेखीची व प्रत्यक्ष गोष्टी घडवून आणण्याची अपेक्षा बँका करीत आहेत. केवळ बुजगावणें म्हणून रिझर्व्ह बँकेचा होणारा उपयोग दिवसानुदिवस कमी उपयुक्त ठरत जाईल, हें उघड आहे.

## बँकिंगच्या वाढीच्या मर्यादा

बँकांनीं आपलें जाळें पद्धतशीरपणें कितीहि वाढविलें आणि बँकिंगच्या सोई अगदी खेडेगांवापर्यंत पोंचविल्या, तरी बँकिंगचा व्यवसाय आंतवट्ट्याचा होणार नाहीं ह्या मर्यादेपलीकडे त्यांना खासच जातां येणार नाहीं. शाखांची संख्या आतां कमी करावी लागत आहे, ही गोष्ट कशाची द्योतक आहे? लोकांचे आर्थिक व्यवहार बँकांच्या सेवेचा फायदा करून घेण्याच्या लायकीचे नसतील, तर बँककचेऱ्यांची संख्या वाढवून फायदा होणार नाहीं. व्यवहार किफायतशीर नसेल, होण्याचा संभव नसेल किंवा तो होणें अवघड असेल, तर बँकांचीं कर्जें त्यास यश प्राप्त करून देणार नाहींत; आणि म्हणून त्यास कर्जें मिळणारहि नाहींत. शेतीचा धंदा जर धंदा ह्या नांवास पात्र होत नसेल तर बिनव्याजीं कर्जें सुद्धां थकतील किंवा बुडीत ठरतील. तीच गोष्ट इतर व्यवसायांसहि लागू पडते. म्हणूनच, हिंदी बँकिंगची प्रगति होण्यास तात्त्विक दृष्ट्या आणि तुलनेनें विचार करता भरपूर वाव असला, तरी व्यावहारिक दृष्ट्या त्यास अतिशय मर्यादा आहेत. बचत केलेला पैसा बँकांकडे

आला पाहिजे, बँकांनीं दिलेल्या कर्जातून नवी संपत्ति निर्माण झाली पाहिजे, त्या नव्या संपत्तीचा अगदी जरूर तेवढाच भाग खर्ची पडून काटकसरीनें सांठवलेला पैसा पुनः बँकांकडे आला पाहिजे, असें रहाटगाडगें चालू राहिलें तरच नवी नवी संपत्ति निर्माण होत राहील. म्हणजे, बचतीस वाव मिळण्यास खर्चापेक्षा उत्पन्न अधिक होत राहिलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे, आपल्या उद्योगधंद्यांतून होणाऱ्या धनापैकी कांहीं भाग मानवी गरजा भागवून नवें धन निर्माण करण्यास उपलब्ध झाला पाहिजे. असलेल्या भांडवलाचा अधिकांत अधिक फलदायी उपयोग झाला पाहिजे. अनुत्पादक कार्यावरील खर्च कमींत कमी राखला पाहिजे. ह्याचा अर्थ, जनतेच्या उत्पन्न–खर्चावर सरकारचें कडक नियंत्रण हवें. केवळ बँकिंगच्या विकासाच्या प्रयत्नानें आर्थिक अभिवृद्धीचा प्रश्न सुटणार नाहीं. परंतु, असलेल्या परिस्थितींत बँकांचा कमाल उपयोग झाला पाहिजे, हें निःसंशय आहे.

## विशिष्ट गरजांसाठी स्वतंत्र व्यवस्था

व्यापारी बँकांचें कार्यक्षेत्र विशिष्ट प्रकारानें मर्यादित असतें. त्यांच्या देण्याच्या (ठेवींच्या) प्रकारावर व रचनेवर त्यांच्या कर्जांची पद्धति आधारलेली असते. व्यापारी बँका आपलें कार्यक्षेत्र वाढविण्याचा कसून प्रयत्न करीत असल्या, तरी विशिष्ट गरजांसाठी विशिष्ट संस्थांचीच आवश्यकता असते. उदाहरणार्थ, कारखान्यांना लागणारें दीर्घ मुदतीचें कर्ज व्यापारी बँका देऊं शकत नाहींत. ही गरज भागविण्यासाठी मध्यवर्ती इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना झालेली आहे. अशाच संस्था राज्यनिहाय स्थापन व्हावयाचें दीर्घकाळ घाटत आहे! लायक कारखान्यांच्या दीर्घकालीन भांडवलाच्या गरजा भागविणाऱ्या ह्या संस्था कितीतरी उपयुक्त कार्य करूं शकतील. आज शेड्यूल्ड बँकांचें सुमारें ४५% कर्ज कारखान्यांना दिलेलें आहे आणि शेतीच्या वाट्यास २% सुद्धां कर्ज आलेलें नाहीं. शेतीच्या गरजा भागविण्यासाठी आज अर्धा शतक सरकारी देखरेखीखाली सहकारी संस्थांकरवीं भांडवल-पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न चालू आहेत, परंतु अद्याप समाधानकारक व्यवस्था होऊं शकलेली नाहीं. आवश्यक त्या मोठ्या प्रमाणावर शेतीस कर्जपुरवठा करण्यास सध्यांच्या योजना अगदी अपुऱ्या आहेत. सरकारी तगाई कर्जें, व्यापारी संस्थांचीं कर्जें, सावकार, व्यापारी बँका आणि प्रत्यक्ष रिझर्व्ह बँक ह्यांपैकी कोणीहि अशी मदत देऊं शकणार नाहीं. सहकारी चळवळीस हें

सामर्थ्य प्राप्त होण्याचा संभव दिसत नाहीं, असा श्री. वा. पुं. वर्दे ह्यांचा ताजा अभिप्राय आहे, तो चिंता निर्माण करणारा आहे. इतर देशांतील अनुभव येथें कितपत उपयोगी पडेल, हें तज्ज्ञांनीं अजमावूनच उपाययोजना केली पाहिजे.

### एक्सचेंज क्षेत्रांत प्रवेश

एक्सचेंज बँकांनीं एक्सचेंजच्या व्यवहाराचा फार मोठा भाग व्यापला आहे आणि हा किफायतशीर व्यवसाय त्यांस मिळत आहे. आज कितीतरी दीर्घ काळ त्यांची ही मोनॉपोली टिकून आहे. एक्सचेंज बँकांच्या व्यवहाराशीं सामान्य हिंदी बँकर्सचा अद्याप परिचयहि झालेला नाहीं, आणि ह्या क्षेत्रांत पाऊल टाकण्याचें धाडस करण्याजोगें सामर्थ्य, दूरदृष्टि आणि क्षमता हीं फारच थोड्या बँकांजवळ असणार. तथापि, कोणीतरी पुढाकार घेतलाच पाहिजे, ह्या दृष्टीनें कांहीं बँकांनीं उपक्रम केला आहे. परराष्ट्रीय व्यापाराचे बँकिंगचे व्यवहार परदेशी बँकांच्या हातीं असणें केवळ आर्थिकच नव्हे, तर इतर व्यापक दृष्टीनेंहि, इष्ट नाहीं. म्हणून अशा ध्येयनिष्ठ प्रयत्नांचें स्वागत केलें पाहिजे.

### डायरेक्टर उच्च विचाराचे व आचाराचे हवेत

बँकांच्या संचालकांना बँकिंगचें व वेगवेगळ्या उद्योगधंद्यांचें चांगलें ज्ञान असणें आवश्यक असतें. व्यवहारकुशल व तारतम्यानें चालणारे संचालक बँकेला लाभले, तर तिच्या भांडवलाचा उत्कृष्ट उपयोग केला जाण्याचा संभव वाढेल, हें स्पष्ट आहे. जॉइंट स्टॉक व सहकारी, दोन्ही प्रकारच्या बँकांच्या डायरेक्टरांपैकीं कांहींना आपण काय मंजूर करीत आहों ह्याची कल्पनाही नसते. त्यामुळें लटपट्या लोकांचें फावतें आणि व्यवस्थेचा दर्जाहि उतरतो. संचालकाची जागा ही मानाची तर खरीच, पण त्याबरोबर ती जबाबदारीची आणि राष्ट्रीय सेवेचीहि आहे ह्याची जाणीव असावयास हवी. बँकेचे डायरेक्टर होण्याची पात्रता नसेल तर तसें सरळ कबूल करून निवृत्त व्हावें, हें चांगलें. ज्यांच्या निर्णयावर ठेवीदारांचा विश्वास आणि त्यांच्या पैशाची सुरक्षितता अवलंबून असते, ते संचालकहि उच्च दर्जाच्या विचाराचे व आचाराचे असणें अगत्याचें आहे. संचालकांनीं बँकेकडून ज्या सवलती घ्यावयाच्या त्या इतरांना मिळूं शकणाऱ्या सवलतींपेक्षा जरा कमीच असणें उत्तम. आपल्या धंद्याला मदत व्हावी, म्हणूनच केवळ संचालक होणाऱ्या डायरेक्टरांकडून हिंदी

बँकिंगच्या प्रगतीस इष्ट तें वळण लागण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. कायद्यानें कितीहि बंधनें घातलीं तरी व्यक्तीच्या नैतिक पातळीवरच व्यक्तीची कृति अवलंबून रहाते.

## कार्यक्षमतेची आवश्यकता

बँकांच्या नोकरवर्गाकडूनहि अधिक कार्यक्षमतेची अपेक्षा आहे. बँकांच्या व्यवहाराबद्दल ग्रेट ब्रिटनसारख्या देशांत जो आदर वाटतो, त्याचें एक प्रमुख कारण बँकांची कार्यक्षमता हें होय. वरपासून खालपर्यंतच्या सर्व नोकरांनीं बँकेचें काम तत्परतेनें व आपुलकीनें केलें तरच बँकेची प्रतिष्ठा वाढूं शकते. कोणत्याहि कारणानें बँकेबद्दल तक्रार येणार नाहीं, अशी दक्षता सर्वांनींच बाळगली पाहिजे. अद्याप कांहीं बँकांतून बँकेच्या कामास घड्याळाप्रमाणें प्रारंभ झाल्यावरहि प्रत्यक्ष व्यवहार सुरू होऊं शकत नाहीं, असें आढळतें. कौंटरबाहेर तुफान गर्दी असतांनाहि आंतील कारकून गप्पा मारीत बसलेला असतो. कामासाठी आलेल्यांना बाहेर खोळंबून ठेवून मॅनेजर मित्रांबरोबर बोलत बसतो आणि संचालक उगीचच मॅनेजरच्या खोलींत ठाणें देऊन बसतात आणि गिऱ्हाइकांची गैरसोय करतात. जे चेक वास्तविक पास व्हावयास पाहिजेत, ते अज्ञानामुळें किंवा फाजील काळजीमुळें परत पाठविण्याची कित्येक व्यवस्थापकांना संवयच जडलेली असते. थोडक्यांत म्हणजे, सर्वच दृष्टीनें सुधारणांस वाव आहे. बँकेच्या नोकरांची पात्रता बँकिंग परीक्षा पास होऊन किंवा अनुभवानें वाढूं शकेल. परंतु, कामाचा दर्जा चांगला राखण्यास इतर गुणांची जोड पाहिजे. इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलचे निवाडे बँका व त्यांचा नोकरवर्ग ह्यांतील सलोखा नष्ट करण्यास कारणीभूत झाले आहेत आणि कायद्यावर आधारलेलीं नवीं नातीं निर्माण झालीं आहेत. कायद्याच्या कक्षेंत रहाण्यासाठी किमान तेवढेंच करावयाचें, अशी उभयपक्षाची प्रवृत्ति बनली आहे, त्याचा बँकांच्या कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम झाला आहे.

## चोख व्यवहार पाहिजे

बँकांची प्रतिष्ठा आणि सेवाक्षमता त्यांच्या प्रचंड इमारतींवर, त्यांच्या भव्य प्रवेशद्वारांवर, त्यांच्या दिखाऊ भपक्यावर आणि जाहिरातबाजीवर अवलंबून नसते. बँकेचें काम किती चोख असतें ह्यावरच सर्व कांहीं अवलंबून आहे. योग्य तो निर्णय कालापहार न होऊं देतां घेणें आणि त्याची अंमलबजावणी कसोशीनें, काटेकोरपणानें व कार्यक्षमतेनें करणें ह्या गोष्टी महत्त्वाच्या

आहेत. बँकेच्या कारभारांत वशिलेबाजीस वाव नाहीं, अशी सर्वांची खात्री पटली पाहिजे. कर्जदारास त्याचा व्यवहार नीट होत असेल तर पुनः कर्ज मिळण्याची खात्री वाटली पाहिजे. आगाऊ अंदाज न करतां भरमसाट कर्जें मंजूर करावयाचीं आणि पैशाची गरज भासली म्हणजे तीं आखडावयाचीं, ह्या गैरशिस्त प्रकारामुळें बिचाऱ्या कर्जदाराची फार कुचंबणा होते. त्याचा कांहींहि दोष नसतांना, त्याचें कॅश क्रेडिट एकाएकीं बंद होतें. त्यामुळें, तोहि एकाच बँकेवर न विसंबतां अनेक बँकांकडे जाऊं लागतो आणि त्यानंतर पुनः अडचणींत येतो. "तुझ्या नेहमींच्या बँकेकडून कर्ज कां घेत नाहींस?" ह्या खोचक प्रश्नाचें समाधानकारक उत्तर तो देऊं शकत नाहीं. ठेवीदाराच्याहि सर्व सोई बँकेनें पाहिल्या पाहिजेत. बँक ही एक संस्था आहे, वैयक्तिक हेव्या-दाव्यास तेथें स्थान नाहीं, हें स्पष्ट झालें पाहिजे.

## परस्पर-सहकार्य

बँकांमध्यें सध्यांपेक्षा कितीतरी अधिक सहकार्यास वाव आहे. चार बँकांचे चालक एकत्र येऊन बोलूं-चालूं-हिंडूं लागले, हींहि एक मोठी अशक्य-प्राय गोष्ट झाली, असें मानण्याइतक्या प्राथमिक अवस्थेंत सध्यांच्या सहकार्याची परिस्थिति आहे. बँकाबँकांमध्यें स्पर्धा असली तरी तिची पातळी अत्युच्च राखून, सर्वांच्याच हिताच्या गोष्टीसाठी बँकांनीं योजना आखून पार पाडणें बँकिंगच्या व्यवसायाच्या हिताचें होईल. सर्व बँका सुस्थितींत असतांनाहि परस्पर-सहकार्य जर कठीण वाटतें तर अडचणीचे प्रसंगीं, म्हणजे ज्यावेळीं त्याची आवश्यकता अतिशय मोठी त्यावेळीं, तें एकदम कसें अवतरणार? कर्ज-दारांबद्दल एके ठिकाणीं माहिती उपलब्ध होण्याची व्यवस्था झाल्यास बँकांची बरीच मोठी चिंता दूर होईल. कांहीं विशिष्ट कामापुरत्या यावयाच्या जाहिरातींत कांहीं बँका गटानें एकत्र झाल्या तरी सुद्धां पुष्कळच प्रगति झाली, असें म्हणतां येईल. एका बँकेंतील ठेवी दुसऱ्या बँकेनें आकृष्ट केल्यानें बँकिंगची वाढ होत नाहीं; नवे ठेवीदार किती निर्माण केले, ह्यावरच बँकिंगची वाढ अवलंबून आहे, हे सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचे उद्‌गार अत्यंत मननीय आहेत. डेक्कन बँक्स असोसिएशन व पुणें बँकिंग असोसिएशन ह्यांनीं केलेला प्रदर्शन–व्याख्यानें–पुस्तिका ह्यांचा उपक्रम येथील बँकांच्या परस्पर सहकार्याची मुहूर्तमेढ ठरो व बँकिंगच्या व्यवसायाची दृढ पायावर वाढ होऊन जनतेच्या आर्थिक उद्धारास त्याचा प्रभावी हातभार लागो, अशी प्रार्थना आहे.

---

### पाक कापसाची किंमत घसरली

लाहोर येथें निघणाऱ्या ' सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट ' ह्या दैनिकानें नुकताच एक भला मोठा अग्रलेख लिहून प. पाकिस्तानमध्यें उद्‌भवलेल्या आर्थिक संकटाकडे लक्ष वेधलें आहे; आणि ह्या संकटाला भारत आणि इंग्लंड जबाबदार आहेत असें म्हटलें आहे. सदर वृत्तपत्राचा खास बातमीदार आपल्या वार्तापत्रांत म्हणतो, "पंजाबमधील कापसाच्या किंमती आजवर कधींहि घसरल्या नव्हत्या इतक्या खालीं घसरल्या आहेत. त्यामुळें सर्व प्रांतांत घबराट उत्पन्न झाली आहे. पंजाबमधील अमेरिकन जातीचा कापूस चांगल्या प्रतीचा असल्यामुळें त्याची निर्यात होते. ह्या कापसाची किंमत १८ रुपये मणापर्यंत घसरली आहे. १९५१ सालीं आर्थिक अरिष्ट आलेलें असतांना सुद्धां दर मणाला ४० रुपयांखालीं किंमत घसरली नव्हती. पाकिस्तानच्या मध्यवर्ती सरकारनें कापसावरील निर्यात कर ५० टक्के कमी केलेला आहे. त्याचप्रमाणें पंजाब सरकारनेंहि कपास फी दर मणामागें १ रुपया होती ती अवघी ४ आणे केली आहे. तरी सुद्धां कापसाच्या किंमती घसरण्याला आळा बसूं शकलेला नाहीं. आर्थिक क्षेत्रांत पाकिस्तानला तोंडघशी पाडण्यासाठी भारत आणि ब्रिटन ह्यांनीं कटच केलेला दिसतो." भारतावरील आरोपाचा लगेच निसटता इनकारहि करण्यांत आलेला आहे. कारण, वार्ताहर पुढें म्हणतो, "कोरिआंतील युद्ध थंडावल्यामुळें कापसाची सांठवण बंद झाली आणि त्यामुळें कापसाच्या किंमती घसरल्या." खरी परिस्थिति अशी दिसते कीं, पाकिस्तान म्हणजे प. पंजाबांत ह्या वर्षी गेल्या वर्षीपेक्षा ५,००,००० गांठी कापूस अधिक पिकला. पाकिस्तानला स्वतः ३,००,००० गांठींपेक्षा अधिक कापूस लागत नाहीं. जगांतील कापसाचें उत्पादनहि वाढलें आणि त्यामुळें कापसाची किंमत घसरली.

---

**जपानांत गुरुद्वार बांधणार—** जपानमधील कोब ह्या शहरांत शिखांचें धर्ममंदिर गुरुद्वार बांधण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. ह्या मंदिरासाठी ७॥ लाख रुपयांच्या देणग्याहि जालंदर मधील दोघां शीख गृहस्थांनीं दिल्या आहेत, असें समजतें. गुरुद्वार बांधण्यासाठी ५ जणांची एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

**रोटोग्रव्हयूर रोटरी मशीन—**नागपूर जवळील सोनेगांव येथें रोटोग्रव्हयूर प्रिंटिंग मशीन बसविण्यांत आलें आहे. हें यंत्र दोन वर्षांपूर्वी भारतांत आलेल्या मि. हेनीक ह्या जर्मन यंत्रज्ञानें भारतामधील साधनसामुग्री वापरून तयार केलें आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें कागदावर तर छपाई करतां येईलच, पण सेलोफोन, रेशीम व कॅलिको ह्यावर पक्क्या रंगाची छपाईहि करतां येईल.

**जर्मनीकडून मालाचे डबे आले—**जर्मनीमधील एका प्रसिद्ध रेल्वेकारखान्याकडे भारतीय सरकारनें मालाच्या १,००० डब्यांची मागणी नोंदविली होती. त्यांपैकीं ५,०० डबे ओखा बंदरांत आले असून ते जुळविण्याचें काम चालू झालें आहे. कलकत्ता बंदरांत कांहीं प्रवासी डबेहि आले आहेत. सर्व डबे अरुंद रुळावर चालणाऱ्या गाड्यांचे आहेत.

**सॅखेलिन बेटांना जोडणारा पूल—**जपानचा समुद्र आणि ओखाटस्कचा समुद्र ह्यांच्यामध्यें सॅखेलिन नांवाचें एक महत्त्वाचें बेट आहे. हें बेट आतां सोव्हिएट रशिआच्या मुख्य भूमीला एका पुलानें जोडण्यांत आल्याचें समजतें. लष्करी दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या ह्या बेटांत खनिज तेलहि सांपडतें. ब्रिटिश तज्ज्ञाच्या मतानें, पूर्व रशिआंतील तेलाच्या उत्पादनांत सॅखेलिन बेट बरीच मोठी भर घालतें.

### हेरिंग माशाचा धंदा

हेरिंग मासे पकडून व ते गोठवून त्यांची विक्री करण्याच्या ग्रेट ब्रिटनमधील धंद्याच्या अभ्यासाची सोय परदेशी विद्यार्थ्यांसाठी करण्यांत आली आहे. नोव्हेंबर अखेर ह्या शिक्षणाचा वर्ग सुरू झाला, त्याचा फायदा नऊ वेगवेगळ्या देशांतील चौदा विद्यार्थी घेत आहेत.

### टेलिव्हिजनचा शिक्षणसंस्थांत उपयोग

न्यूयॉर्कमधील कॉर्नवेल विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना फिजिक्स विषयाचे कांहीं पाठ टेलिव्हिजनच्या पडद्यावर मिळूं लागले आहेत. विद्यार्थ्यांना शस्त्रक्रिया समजावून देण्यासाठीहि टेलिव्हिजनचा उपयोग करण्यांत येऊं लागला आहे.

### फिल्म फेस्टिव्हलमधील हिंदी चित्रपट

न्यूयॉर्क येथील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलसाठी तीन हिंदी चित्रपटांची निवड झाली आहे. इंडियन आर्ट थ्रु दि एजेस, फरगॉटन एंपायर आणि सेव्हन पॅगोडास, हे ते तीन चित्रपट होत. पहिल्या चित्रपटांत ५,००० वर्षांपूर्वींचें मोहेंजोदारो येथील शिल्प पहाण्यास मिळेल. दुसऱ्या चित्रपटांत विजयानगरमधील जुनें नक्षिकाम पहावयास मिळेल. तिसऱ्या चित्रपटांतील धर्मराज मंडप आठव्या शतकांतील कलाकौशल्य दाखवील.

---

## COOPERATION AND ACCOUNTANCY DIPLOMA BOARD.

**The undermentioned candidates have been declared by the Cooperation and Accountancy Diploma Board to have passed the Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in October 1952, at Poona.**

**Passed in the whole Examination** including those who passed in one or the other part previously.

**II Class**

Mehta C. S.

**Pass Class**

Bhatt K. P., Phadnis R. G., Savdi V. B., Anturkar G. N., Bhagwat D. K., Bhavnani H. R., Dalal B. K., Dixit G. C., Jog A. S., Koimtur G. V., Parihar T. U., Patel B. B., Patel N. V., Sabane P. D., Wani G. M., Pande N. P., Purohit B. B., Shastri G. N., Bapat R. N., Bhat V. G., Bondre V. G., Deshpande V. N., Gavade Y. S., Joshi C. C., Koli U. R., Pande H. P., Patel D. B., Patel V. G., Thatte M. S., Deshpande R. K.

**Passed in Accounts Group only.**

Alalageri B. K., Bokil C. K., Inamdar B. H., Padman G. K, Patil B. B., Patil V. R., Ravetkar D. M., Talikoti R. H., Aminbhavi S. R., Deshpande M. S., Inamdar N. S., Patil B. N., Patil K. M., Rahator S. H., Shukla R. V., Vanarase V. R.

**Passed in Cooperation Group only.**

Karmarkar A. M, Desai S. S., Golwala P. M., Mathad B. R., Mudkavi V. B., Sovani G. V., Deshpande M. R., Dixit N. M., Kubsad S. B., Mathad G. S., Rayadurga R. K.

**Deshpande V. N., Joag A. S., and Patel V. G. who were former Baroda State Servants and who are new declared passed, are not eligible for the award of the Government Diploma in Cooperation and Accountancy.**

**P. J. Chinmulgund**
Registrar and Chairman,
Co-operation and Accountancy
Diploma Board, Poona 1.

### भारतीय चहाला अमेरिकेंत बाजारपेठ

अमेरिकेच्या टी असोसिएशनचे अध्यक्ष मि. ई. जे. व्हिनिकॉंब ह्यांच्या मतानें अमेरिकेंत भारतीय चहाला हल्लींपेक्षा अधिक विस्तृत बाजारपेठ मिळूं शकेल. सध्यां अमेरिकेला जो चहा निर्यात होतो तो मुख्यतः भारत आणि सीलोन ह्या देशांकडून होतो. इंडोनेशिआहि थोडाबहुत चहा निर्यात करतो. अमेरिकेच्या टी असोसिएशननें अमेरिकन गृहिणींना चहाची गोडी लावण्यासाठीं बराच प्रचार चालविला आहे. पोस्टर्स व टेलिव्हिजनद्वारां हा प्रचार करण्यांत येत आहे. प्रचाराचें फल म्हणूनच कीं काय, गेल्या वर्षीपेक्षा चालू वर्षी अमेरिकेंतील चहाचा खप ८ टक्के वाढला असल्याचें त्यांनीं सांगितलें. कॉफीची किंमत जास्त असल्यामुळेंहि चहाच्या प्रचाराला उठाव मिळत आहे. अमेरिकेंत १ पौंड कॉफीला ८० ते ९० सेंट पडतात आणि त्यांत ४० ते ५० कप कॉफी होऊं शकते. चहाच्या एका पौंडाला सुमारें ४० सेंट्स पडतात आणि त्यांत २५० कप चहा तयार होऊं शकतो. उन्हाळ्यांत बर्फमय चहा घेण्याची प्रथाहि अमेरिकेंत पडत चालली आहे. चहाच्या प्रचारासाठीं दरसाल सुमारें ६०,००,००० डॉलर्स खर्च करण्यांत येतात, पण मि. व्हिनिकॉंब ह्यांच्या मतें ते फार नाहींत. कारण, बीरच्या प्रचारावर ९.८ कोटी डॉलर्स खर्च करण्यांत येतात. मि. व्हिनिकॉंब भारतांतील चहाच्या उत्पादनाचीं व बाजारपेठेचीं सर्व केंद्रें डोळ्यांखालून घालणार आहेत. १९५३ च्या जानेवारींत न्यूयॉर्क येथें चहा निर्यात करणाऱ्या देशांच्या प्रतिनिधींची एक बैठक भरणार आहे. त्या बैठकीला भारतीय प्रतिनिधी हजर राहील असें समजतें. भारतामधील चहाचे मळे सध्यां आर्थिक विपन्नावस्थेंत सांपडले आहेत. तींतून बाहेर पडण्यासाठीं अमेरिकेच्या वाढत्या बाजारपेठेचा चांगला उपयोग होईल; आणि वर डॉलर्सची प्राप्तीहि होण्यासारखी आहे.

### भारतामधील पंख्यांचें उत्पादन

कलकत्ता येथील फॅन मेकर्स असोसिएशनची वार्षिक सभा नुकतीच भरली होती. ह्या सभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना मि. पी. एच्. बोलंड म्हणाले कीं १९५१ सालीं भारतांत पंख्यांच्या उत्पादनाचा उच्चांक गांठला गेला. ह्या सालीं एकूण २,१२,४०० पंखे निर्माण करण्यांत आले. त्यांपैकीं १,९४,८३० पंखे असोसिएशनशीं निगडित असलेल्या कंपन्यांनीं तयार केले होते. १९५२ सालच्या पहिल्या सात महिन्यांत मात्र उत्पादन पूर्वीसारखें होऊं शकलें नाहीं. एक तर बाजारांत मालाला मागणी कमी झालेली आहे. दुसरें कारण म्हणजे कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा हें होय. इतर धंद्यांना ज्याप्रमाणें मंदीला तोंड द्यावें लागत आहे त्याचप्रमाणें पंख्याच्या धंद्यालाहि द्यावें लागत आहे. ह्या धंद्यासंबंधीं टॅरिफ बोर्डानें केलेल्या शिफारसींचा उल्लेख करून ते पुढें म्हणाले "ह्या धंद्याची वाढ आतां इतकी झाली आहे कीं, देशांतील सर्व मागणी त्याला पुरवता येऊन कांहीं थोड्या प्रमाणांत पंख्यांची निर्यात करणेंहि आतां शक्यतेच्या कोटींत आलें आहे. म्हणून सरकारनें टॅरिफ बोर्डाच्या शिफारसी अंमलांत आणणें जरूर झालें आहे. रेल्वेला लागणाऱ्या पंख्यांचा एखादा सर्वमान्य नमुना तयार करणें आवश्यक आहे. इंडियन स्टॅंडर्डस इन्स्टिट्यूशननें ह्या बाबतींत लक्ष घातलें तर बरें होईल. सध्यां जो विक्रीकर घेण्यांत येतो त्यामुळें कंपन्यांच्या कारभारांत बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या आहेत. सर्व राज्यांनीं मिळून विक्रीकराबाबत एकाच प्रकारचे नियम अंमलांत आणण्याचें ठरविलें, तर तें अधिक सोईचें होईल."


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

**दि रत्नाकर बँक, लि.**

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन


श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B., मॅनेजर

**किर्लोस्कर**

५ हॉ.पॉ.वर चालणारा

आमच्या वसंत नं. ३, शरद वगैरे पॉवर चरकांच्या मालिकेंत नवीन "कोयना" चरकाचे आगमन. कमी पॉवर लागत असल्यानें भांडवलांत बचत झाली आहे.



विशेष माहितीसाठीं लिहा—

किर्लोस्कर बंधु. लि., किर्लोस्करवाडी (द. सातारा

## दुष्काळ, द्रव्योत्पादक पिकें व शेतकरी

( रि. सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, रावबहादूर **न. स. जोशी**, ह्यांचें पत्र )

श्री. " संपादक अर्थ " यांसः—

स. न. वि. वि.

३–१२–५२ च्या अंकांतील श्री. भावसार यांचें पत्र, कनालखालीं भिजणाऱ्या जमिनींच्या मालक वा खंडकरी शेतकऱ्यांचे विचारांची दिशा, योग्य रीतीनें ( Typically ) दर्शवितें.

त्यांच्या विचारावरून हें स्पष्ट आहे कीं, कनालखालीं जमीन असणारा शेतकरी, बाकीच्या प्रांतांतील दुष्काळपीडित जनतेकरितां धान्योत्पादन करील ही अपेक्षा चूक. त्याला जास्तींत जास्ती द्रव्य ज्यायोगें मिळेल असेंच पीक तो करणार व त्याच्या दृष्टीनें तें योग्य आहे.

" प्रांतांतील शेंकडा २–३ टक्के जमिनीला नवीन कालव्यांचें पाणी मिळण्यास खर्च येणार १०० कोटी रुपये. पण ते खर्च करून कनाल बांधले तरी तेथील शेतकरी धान्योत्पादन करील अशी आशा बाळगणें चूक व ते जादा धान्योत्पादन दुष्काळी भागांतील १ कोटी जनतेच्या उपयोगी पडेल अशी अपेक्षा करणें त्याहूनहि चूक. " हेंच स्पष्टपणें दाखविण्याचा माझा हेतु होता व उपरिनिर्दिष्ट लेखानें त्यांतील विधानाला चांगलीच पुष्टि मिळाली, हें चांगलें झालें.

मध्यप्रांतांतील कालव्यावर बहुतेक सर्व पाणी धान्यपिकांनाच देतात व तेथील शेतकरी तें घेऊन धान्यपिकें करतात, हें नमूद केल्यास उद्बोधक होईल अशी आशा आहे. कारण तेथील सरकार धान्यपिकांनाच पाणी देतें. प्रश्न असा कीं, जी गोष्ट मध्यप्रांतांत तेथील लोकांचे प्रतिनिधी करतात तीच गोष्ट मुंबई प्रांतांत करतां येत नाहीं, कां करावीशी वाटत नाहीं, कां तसें करणें जमत नाहीं ?

निरा–राईट, म्हसवड, एकरूक वगैरे कामें बांधलीं त्यावेळीं धान्याच्या दरावर नियंत्रण नव्हतें व १ जानेवारी १९५३ पासून तें आतांहि नसणार. तेव्हां धान्याचे भाव वाढवून देण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

धान्यपिकांना इतर कोणत्या सवलती पाहिजेत त्याचा खुलासा झाला असता, तर उत्तर देणें शक्य झालें असतें. मात्र कॅनालखालीं भिजणाऱ्या सर्वच पिकांस बरीच मोठी सवलत आतांहि मिळत असते, हें खालीं दाखविलें आहे.

स्वतःचें भांडवल घालून आपल्या जबाबदारीवर विहीर बांधणाऱ्या कनाल बाहेरील शेतकऱ्याला विहिरींतून उपसून पाणी घालण्यास कनालखालील पाण्याच्या दराच्या मानानें तिप्पट ते चौपट खर्च येतो. ( तोहि गरीब शेतकरीच असतो. ) अर्थात् विहिरवाल्या शेतकऱ्याशीं तुलना करितां कनालचें पाणी मिळणाऱ्या शेतकऱ्यास दर एकरीं कनालच्या पाणिपट्टीच्या दराचे दुप्पट वा तिप्पट द्रव्य अप्रत्यक्ष सहाय्य म्हणून मिळतें, ही काय कमी सवलत झाली ? दोघेंहि शेतकरीच ना ?

सारांशः मुख्य प्रश्नच हा कीं कनाल कोणत्या उद्देशानें बांधावयाचा ?

( १ ) ज्या ३–४ टक्के क्षेत्रास कनालचें पाणी देतां येणें शक्य आहे तेथील सुमारें १ लक्ष शेतकऱ्यांच्या करितां ?

कीं ( २ ) वरील १ लाखापैकीं ज्या १०,००० शेतकऱ्यांना उसांस पाणी मिळूं शकेल त्यांचेकरितां ?

कीं ( ३ ) ज्यांच्या नांवावर कर्ज काढून कालवे बांधावयाचे त्या ३ कोटी जनतेकरितां ?

कीं ( ४ ) जेथें कनाल होऊंच शकत नाहीं अशा १ कोटी जनतेकरितां ?

कीं ( ५ ) दुष्काळी प्रदेशांतील एक कोटी जनतेपैकी खरोखरच उपाशी वा अर्धपोटी राहणाऱ्या लाख–दोन लाख लोकांकरितां ?

विचारवंतांनीं याचा नीट निकाल लावावा. दाखवावयाचे दांत वरील क्रमांक ३ ते ५ प्रमाणें व खावयाचे दांत क्रमांक १ व मुख्यतः क्र. २ चे, असा वैचारिक गोंधळ होऊं देऊं नये.

प्रत्यक्षांत मात्र कनालचा खरा फायदा वरील क्रमांक १ वा क्र. २ च्या जनतेला मिळत नाहीं ! त्यांतील मुख्य हिस्सा ( lion's share ) जातो साखर–गूळ कारखानदारांना; त्यांना वार्षिक २० ते ३५ टक्के डिव्हिडंड १०–१५ वर्षें मिळाला ( असें मी " अर्था " च्या नोव्हेंबरचे अंकांत वाचल्याचें स्मरतें ) तरी त्यांचीहि पाण्याच्या दराच्या बाबतींत व इतर अनेक बाबतींत सवलती पाहिजेत म्हणून जोराची मागणी आहेच !!!

सवलती मागणाऱ्यांच्या जोरावरूनच ठरवावयाचें तर खरी अडचण दिसते साखर–कारखानदारांची ! त्यांच्या खालोखाल ऊंसवाल्या बागाईतदारांची; उपाशी मरणारा ओरड करीत तरी नाहीं, किंवा ती लोकांना ऐकूं तरी जात नाहीं !!

अशा रीतीनें सवलती मागण्याच्या स्पर्धेंत " खऱ्या दुष्काळपिडीताचे " ( क्र. ५ चे ) मूकबळी पडतच राहणार कीं काय ? कनालवरील भांडवली खर्च व तोट्याचें समर्थन करतांना मात्र त्यांचें नांव पुढें !!!

आपला,

पुणें ५–१२–५२ न. स. जोशी


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

स्थापना १९११

टेलिफोन नं. २५४६१ / ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : कार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

**भरपाई झालेलें भांडवल**

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,९५,४०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ५९,९५,४०० |
| गंगाजळी व फंड | रु. ४३,२८,९०० |
| ठेवी | रु. ८,५४,८१,४०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,८५,०२,२०० |

**१५ जिल्ह्यांत ६३ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे

ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

**परदेशांकडे पाठविलेल्या मालाची उधारी**—ब्रिटिश माल निर्गत करणारे व्यापारी जर्मन व्यापाऱ्यांच्या विरुद्ध तक्रार करूं लागले आहेत. परदेशीं पाठविलेल्या मालावर करांत रिबेट, निर्गत होणाऱ्या मालास बोनस, डॉलर्सच्या बाबतींत सवलती, दीर्घ मुदतीच्या कर्जाची सोय, इत्यादि बाबींचा ह्या तक्रारींत समावेश होतो. जर्मनी आपल्या निर्गत व्यापाराची विस्कटलेली घडी पुनः बसवूं लागला आहे आणि विशेषतः दक्षिण अमेरिकेंतील देशांत जर्मनीची स्पर्धा इतर देशांना जाणवूं लागली आहे. परदेशीं पाठविण्यांत येणाऱ्या मालाला दीर्घ मुदतीच्या कर्जाची सोय ब्रिटिश बँका करीत नाहींत; परंतु जर्मन बँका करतात. निर्गत मालाच्या उधारींत गुंतलेला पैसा ब्रिटिश व्यापाऱ्यांनाच पुरवावा लागतो. माल निर्गत करणाऱ्या व्यापाऱ्यांशीं हितसंबंध असलेली "क्रेडिट इन्शुअरन्स असोसिएशन" ह्या बाबतींत प्रयत्न करीत आहे.

**बिहार राज्यांत विक्री-कर**—डिसेंबर १९५२ च्या सुरवातीपासून बिहार राज्यसरकारनें एक रुपयावर ५ पै ह्या दरानें विक्रीकर घेण्यास सुरवात केली आहे. कर २२ निरनिराळ्या वस्तूंवर घेण्यांत येत आहे.

**राज्याभिषेकाचा चित्रपट**—ग्रेट ब्रिटनच्या राणीच्या सबंध राज्याभिषेक समारंभाचा रंगीत चित्रपट घेण्यांत येणार असून तो लागलीच सर्व जगभर दाखविला जाईल. हा समारंभ टेलिव्हिजनवर दाखविला जाणार आहेच.

**ताजमहालचा बोलपट**—सुप्रसिद्ध ब्रिटिश दिग्दर्शक सर अलेक्झांडर कोर्डा हे ताजमहालभोंवतीं गुंफलेल्या गोष्टीचा एक बोलपट पुढील वर्षी भारतांत येऊन काढणार आहेत असें समजतें. बोलपट संपूर्णपणें भारतांतच तयार करण्यांत येणार असून त्याच्या हिंदी व इंग्रजी आवृत्त्या निघणार आहेत. तो रंगीत निघेल.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## ११ डिसेंबर १९५२

### नवीन हंगामाची साखर करण्यास सुरुवात

मशिनरीकरितां घेतलेल्या अेक वर्ष मुदतीच्या ठेवी परत करण्याकरितां सिंडिकेट तीन वर्षे ७ टक्के व्याजाच्या ठेवी स्वीकारीत आहे.

:: ठेवींच्या व्याजाचे दर ::

| | | | |
|---|---|---|---|
| मुदत तीन वर्षें | ... | व्याज | ७ (सात) टक्के |
| मुदत दोन वर्षें | ... | व्याज | ६॥ (साडेसहा) टक्के |
| मुदत एक वर्ष | ... | व्याज | ६ (सहा) टक्के |

**शेअर-विक्री सुरू आहे.**

शेअर व ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. १९ नोव्हेंबर १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.